# मुबारक बेगम - भाग १



मुबारक बेगम मुंबईतील ऑपेरा हाऊस विभागातील केनेडी ब्रिजजवळ कुठेतरी, आपल्या कुटुंबासोबत रहात असे. परिस्थितीमुळे ती दु:खी झाली होती आणि ती सर्वांशी फटकूनच वागत असे. परंतु मध्यंतरी एच् एम् व्ही या कंपनीने तिची गाण्याची एक कॅसेट काढली होती आणि तिची वारेमाप विक्री झाल्यामुळे तिच्या दु:खाला थोडी सुखाची झालर मिळाली असे म्हटले तर वावगे होणारं नाही. कलावंत मंडळी फारच संवेदनाशील असतात असे म्हणतात, त्यामुळे विस्मरणात गेलेल्या एखाद्या कलावंताची अशी कॅसेट बाजारात येऊन तिला प्रचंड प्रतिसाद मिळाला तर त्याला ह्याहून मोठे सुख कोणते? असेच म्हणावे लागेल ना?

एकदा मी त्यांना म्हटले, “मुबारकजी, आपण काही फार जास्त गाणी गायला नाहीत पण जे काही गायला ते मात्र अप्रतिमच होतं.” त्यावर त्या म्हणाल्या, “अहो, काय सांगू तुम्हाला, त्यांनी माझे पंखच छाटले तर...”
“कुणी कापले तुमचे पंख? कळू दे तरी आम्हाला...”
“जाऊ दे ना! आता त्या गोष्टींची उजळणी करण्यात काय अर्थ आहे ?
परंतु ह्या मुलाखतीदरम्यान किमान दोन वेळा तरी त्यांनी ह्या ‘पंख छाटण्याचा’ उल्लेख केला. भरारी मारण्याची उमेद गेलेल्या पक्षासारखी त्यांची अवस्था झाली होती. उंच भरारी कशी घ्यायची आणि त्यात काय थरार असतो ते या पक्ष्याला चांगलंच माहीत होतं. तिला विरोध करणाऱ्या लोकांची तिने जरी नावं घेतली असती तरी अर्थातच इथे त्यांचा उल्लेख केला गेला नसता हे उघडच आहे. पण म्हणून परिस्थिती बदलत नाही. मुबारक बेगम यांचा आवाज अप्रतिम आणि मनाचा ठाव घेणारा होता.

त्यावेळच्या इतर गायिकांपेक्षा त्यांच्या आवाजाचा बाज अगदीच वेगळा होता. उदाहरणच द्यायचं तर त्यांचं 'बेमुर्रवत बेवफा, बेगाना ए दिल आप हैं' हे गाणंच ऐका. ग्रीष्मात पावसाचा शिडकावा व्हावा तसा ताजेपणा तिच्या गाण्यात होता. तिने गायलेल्या गाण्यांच्या पुढे दिलेल्या यादीवरूनही तुमच्या हे लक्षात येईल की हा ताजेपणा फक्त काही सुरम्य गाण्यांत किंवा खूप प्रसिद्ध असलेल्या संगीतकारांकडे तिने गायलेल्या गाण्यांतच तो नव्हता तर काही कमी प्रसिद्ध गाण्यांतूनही तो पुरेपूर दिसत असे. अशी गाणीही मुबारकच्या आवाजामुळेच गाजत असत. थोडक्यात सांगायचं तर तिचा उठावदार आवाजच या सर्व गाण्यांना उठावदार करत असे. असे असताना तिला आणखी काही गाणी मिळायला हवी होती असे नाही वाटत ?

परंतु ह्याला दुसरी बाजूही होती. ती जेव्हा गात होती तेव्हाच लता, आशा, गीता दत्त आणि बऱ्याच जणी छानच गात होत्या. तसे पाहिले तर काहींना त्यांच्या क्षमतेपेक्षा बरेच कमी यश मिळाले असे म्हणायला हरकत नाही. कुणीतरी ह्या सुवर्णकाळात विनोदाने असेही म्हटले होते की काही ख्यातनाम गायिकांना (लेडी सिंगर्स) आपण भेंडी (लेडी फिंगर्स) एवढ्याच कामाच्या आहोत असे वाटले असेल ! अशी बरीच मंडळी होती. त्यामुळे मुबारकजी, फार जिवाला लावून घेऊ नका बुवा !

अशा परिस्थितीत, थोडीच गाणी म्हणून देखील रसिक श्रोत्यांच्या हृदयात ठसा उमटविण्याचे श्रेय मुबारक बेगम यांच्याकडे नक्कीच जाते. अगदी आत्ता सुध्दा मुबारक बेगम यांचे गाणे कानावर पडते तेव्हा 'ही गायिका कोण असावी' असा थोडाही संशय मनात येत नाही आणि तिच्या वेळी गाणी अर्थपूर्ण शब्दांत रचलेली असल्यामुळे ते शब्द आणि तिचा आवाज आपल्या स्मरणात खूप वेळ रेंगाळत राहतो.

मुबारक बेगमसह चंदेरी पडद्यावरील संगीतक्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित असलेल्या एका कार्यक्रमाच्या वेळी अमिन सयानी यांनी नेमकी हीच भावना व्यक्त केली होती.

"बहनो और भाईयो" अशी सुरुवात करून ते म्हणाले, "काय जमाना होता तो ! ह्या सर्वांना पाहून मला गत काळातील गाण्यांची आठवण झाली. तेव्हा अशी गाणी रचली जात असत जशी की - 'ये बिजली राख कर जायेगी तेरे प्यार की दुनिया, ना फिर तू जी सकेगा और ना तुझको मौत आयेगी ! कभी तनहाईयों मे यूँ ही हमारी याद आयेगी. अंधेरे छा रहे होंगे के बिजली कौंध जायेगी.'

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून)

NOTE: Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com